2017-18

2017-18

ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

Dr. V. G. Wasu.
H.O.D. History

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 3.42 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XV, Vol. II, Jan. 2017 To June 2017


# छत्रपती शिवाजी महाराजांची यूध्दनिति एक अध्ययन

डॉ. व्ही. जी. वसू
इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. एच. एन.सिन्हा महाविद्यालय,
पातूर, जि. अकोला (महाराष्ट्र) भारत

8 Research Paper - History

सतराव्या शतकात शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना करून केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात एक नवे तेजस्वी पर्व सुरू केले. या सुमारास महाराष्ट्रात आदिलशहा, कुतुबशहा, मुघल, सिद्दी आणि पोर्तुगीज या समर्थ सत्ताधिशांच्या राजवटी होत्या. याशिवाय इंग्रज, डच, फ्रेंच या पाश्चात्त्य वखारवाल्यांच्या वसाहती पश्चिम किनाऱ्यावर होत्या. त्यांच्या स्वतंत्र सत्ता भारतात किंवा महाराष्ट्रात नसल्या तरी स्थानिक राजकारणात आपल्या स्वार्थासाठी भाग घेण्याची त्यांची प्रवृत्ती होती. अशा प्रकारे महाराष्ट्रात या बलाढय सत्ताधिशांशी झुंज देवून स्वराज्य स्थापन करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु शिवाजीमहाराजांनी सर्व बलाढय सत्ताधिशांशी मुकाबला करून, एवढेच नव्हे तर स्वराज्य कार्यात विघ्न आणणाऱ्या मराठा जहागीरदारांनाही वठणीवर आणून स्वराज्याची स्थापना केली; म्हणूनच शिवाजींना युगपुरूष मानले गेले. स्वराज्याची स्थापना आणि विस्तार करताना शिवाजींनी अप्रतिम युध्दनीतीचा अवलंब केला. किंबहुना, शिवाजींच्या अलौकिक यशाचे रहस्य म्हणजे त्यांचे युध्दतंत्रच होते. समकालीन पाश्चात्त्य वखारवाल्यांनी शिवाजीमहाराजांच्या युध्दकौशल्याची तारीफ केलेली आढळते. त्यांच्या पत्रव्यवहारातून शिवाजीमहाराजांना उद्देशून रोमन सम्राट सीझर, रोमन सेनापती हॅनीबाल, ग्रीक सेनानी अलेक्झांडर यांच्या उपमा दिलेल्या आढळतात. एकोणिसाव्या शतकात जे पाश्चात्त्य अधिकारी भारतात आले त्यांनीही शिवाजीच्या युध्दतंत्राचा फार मोठा गौरव केलेला आढळतो. त्यांनी शिवाजीमहाराजांची तुलना पीटर-द-ग्रेट, नेपोलियन यांच्याशी केलेली आढळते. शिवाजीमहाराजांच्या समकालीन असलेल्या मुघल दरबारातील लेखकांनीही त्यांच्या

मध्ययुगीन भारतात आरमारचे महत्त्व ओळखणारा तो एकमेव राज्यकर्ता मानला जातो. प्रसिध्द इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी शिवाजीमहारांचा 'भारतीय आरमाराचे जनक' म्हणून गौरव केलेला आहे. स्वराज्य स्थापनेनंतर बुध्दी कौशल्याचे डावपेच, वैयक्तिक साहस, गुप्त हालचाली, शत्रूंवर अचानक हल्ले इत्यादी प्रकारांचा महाराजांनी उपयोग करून यश संपादन केले. १६६६ नंतर त्यांनी आमने-सामने लढाईला किंवा मैदानी युध्दाला योग्य असे लष्करी सामर्थ्य उभारले. मैदानी लढायांना आपले सैन्य आता कमी पडणार नाही याची खात्री पटल्यावर महाराजांनी राज्याचा चौफेर विस्तार केला. राज्याभिषेकानंतर दक्षिण स्वारी काढून मैदानी लढाईत शेरखानाविरूध्द मोठा विजय संपादन केला. अशाप्रकारे एकाच तंत्रावर शिवाजीमहाराजांनी मदार ठेवलेली नव्हती. उलट, आपले शत्रू समर्थ असून त्यांच्याजवळ आधुनिक शस्त्रसामुग्रीआहे, हे लक्षात घेऊन महाराजांनी आपले सामर्थ्य सतत वाढविले. पाश्चात्य वखारवाल्यांशी नेहमी संपर्क साधून त्यांच्याकडून आधुनिक शस्त्रास्त्रे, पितळी तोफा आणि दारूगोळा मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**एका वेळी एकच लढा :-**

शिवाजीमहाराजांच्या युध्दनीतीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे एकावेळी एकाच शत्रूबरोबर लढा देणे हे होय. दक्षिणेत अनेक शत्रू असताना एकावेळी एका शत्रूबरोबर लढा देणे आणि इतरांना तटस्थ ठेवणे ही एक विलक्षण कसरत होती. दोन किंवा तीन शत्रूंशी एकाच वेळी लढण्याचा प्रसंग आला असता तर आपल्या चिमुकल्या स्वराज्याचे रक्षण करणे महाराजांना अवघड झाले असते. मिर्झाराजे जयसिंगाने १६६५ मध्ये महाराजांविरूध्द मोहीम काढली. दक्षिणेत येताच त्याने महाराजांच्या सर्व शत्रूंना त्यांच्या विरूध्द चिथावले.

**आपल्या भूमीवर युध्द नको :-**

शिवाजीमहाराजांच्या युध्दनीतीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे युध्दप्रसंग शक्यतो आपल्या भूमीमध्ये होवू नये यासाठी ते दक्ष असत. शत्रू जर आपल्या स्वराज्यात घुसला तर स्वराज्याच्या सरहद्दीवरील शत्रूच्या प्रदेशावर हल्ले करून त्याचे लक्ष विचलित करावयाचे आणि त्याला स्वराज्याच्या भूमीवरून माघार घेण्यास भाग पाडावयाचे असे हे शिवाजीमहाराजांचे तंत्र होते. शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी याच तंत्राचा अवलंब केला. त्याचप्रमाणे सिद्दी आणि आदिलशहा यांच्याविरूध्द लढतानाही महाराजांनी हे तंत्र अनेकवेळा वापरल्याचे आढळते.लष्करीसामर्थ्यांमध्ये शिवाजीमहाराजांनी आमने-सामने लढाईचाही किंवा मैदानी लढाईचाही अवलंब केलेला आढळतो. त्यादृष्टीने वणी-दिंडोरीची लढाई, फोंडयाचा वेढा, कर्नाटक स्वारी इत्यादी अनेक युध्दप्रसंगांचा उल्लेख करता येण्यासारखा आहे.

**युध्द काळातही रयतेला दिलासा :-**

शिवाजीमहाराजांच्या युध्द नीतीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे युध्दामुळे गोरगरीब

युध्दतंत्राची तारीफ केलेली आहे. औरंगजेबाचे दरबारी लेखक भीमसेन सक्सेना याने शिवाजीमहाराजांना 'सिपाही सालेर' म्हणजे अव्दितीय सेनानी असे म्हटले आहे. साकी मुस्तेदखान, खाफीखान मनुची, ईश्वरदास नागर इत्यादी मुघल दरबारी लेखकांनी शिवाजीमहाराजांच्या युध्दनीतीची प्रशंसा केलेली आढळते.

**गनिमी कावा :-**

आपल्या युध्दनतीमध्ये प्रारंभीच्या काळात शिवाजीमहाराजांनी गनिमीकावा या तंत्राला प्राधान्य दिले होते. गनिमकाव्याची पध्दती शिवपूर्वकालीन असून तुर्क आणि अरब लोकांना या तंत्राचा चांगला परिचय होता. दक्षिणेत बहमनी राजवटीत मलिक अंबरने मुघलांविरूध्द लढताना या तंत्राचा अवलंब केला. मलिक अंबर समवेत शहाजीराजे भोसले यांनी गनिमी काव्याचा अवलंब करून मुघलांवर मात केली. मलिक अंबर यांच्या मृत्यूनंतर १६३६ मध्ये मुघल बादशहा शहाजहान याने निजामशाही नष्ट करण्यासाठी दक्षिणेची स्वारी काढली. विजापूरच्या आदिलशहाबरोबर तह करून त्याच्या मदतीने निजामशाही नष्ट करण्याचा चंग शहाजहानने बांधला. यावेळी निजामशाहीच्या सत्तेवर अल्पवयीन राजा होता. परंतु शहाजींनी स्वतःच्या हाती सर्व सूत्रे घेवून शहाजहानविरूध्द प्रदीर्घ काळ लढा दिला. हा लढा गनिमी काव्याचाच होता. जरी शेवटी शहाजींना अपयश आलेले असले तरी मुघल सम्राटाविरूध्द गनिमी काव्याने लढता येणे शक्य आहे हे त्यांनी सिध्द केले. या लढयासाठी सहयांद्रीच्या डोंगराळ प्रदेशाचा आणि डोंगरमाथ्यावर असलेल्या किल्ल्यांचा त्यांनी मोठया कौयाल्याने उपयोग केला. शहाजींच्या या प्रयोगाचा शिवाजीमहाराजांना स्वराज्य स्थापन करताना उपयोग झाला. शहाजींचा प्रयोग शिवाजीराजांना मार्गदर्शक ठरला. स्वराज्य स्थापन करताना शिवाजीमहाराजांनी डोंगरी किल्ल्यांचा आणि गनिमी कावा युध्द पध्दतीचा यथायोग्य अवलंब केला. गनिमी तंत्राचा उपयोग करताना त्यांनी या तंत्रात सुधारणा केल्या. शत्रुपक्षाला नामोहरण करण्यासाठी गनिमी काव्याचे वेगळे तंत्रच प्रगत केले. १६६० मधील कारतलबखाना विरूध्द उंबरखिंडीत शिवाजीमहाराजांनी दिलेला प्रखर लढा त्यांच्या युध्द पध्दतीचा अभ्यास करण्यास उपयुक्त आहे. त्याच वर्षी शिवाजीमहाराजांनी पुण्यामध्ये त्यांच्याच वाडयात तळ ठोकून बसलेल्या शाहिस्तेखानावर अचानकपणे छापा घातला. अगदी मध्यरात्री शाहिस्तेखानाला आपला बाडविस्तारा गुंडाळून कुटुंबासह आणि सैन्यासह अहमदनगरचा रस्ता धरावा लागला.

**मैदानी आणि सागरी युध्दतंत्र :-**

शिवाजीमहाराजांनी शत्रूंविरूध्द दिलेले सर्वच लढे गनिमी पध्दतीचे होते असे मानणे चूक आहे. स्वराज्याचा जसा विस्तार होत गेला त्याप्रमाणात शिवाजीमहाराजांनी लष्करातही वाढ केली. आग्र्याहून परत आल्यावर १६६६ नंतर शिवाजीमहाराजांनी अतिशय परिश्रम घेवून लष्कराची नवी रचना केली. समुद्र किनाऱ्यावरील शत्रूंशी झुंज देण्यासाठी आपले स्वतःचे आरमार उभारले.

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 3.42 ISSN 0976-0377 Issue : XV, Vol. II, Jan. 2017 To June 2017 57
Interlink Research Analysis

नेहमी दक्ष असत.
आणि निरपराध रयतेला कोणताही उपसर्ग पोहोचू नये म्हणून शिवाजीमहाराज नेहमी दक्ष असत.
युध्दाच्या प्रसंगी किंवा लष्करी हालचालींच्या प्रसंगी आपल्या सैन्याकडून रयतेवर कोणत्याही प्रकारचे
अत्याचार होवू नयेत म्हणून शिवाजीमहाराज अतिशय दक्ष असत. या दृष्टीने त्यांचे एक पत्र अतिशय
बोलके आहे. चिपळूणजवळ हलवर्ण या ठिकाणी शिवाजीमहाराजांच्या सैन्याची एकदा छावणी पडली
होती. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना आणि अन्य गावकऱ्यांना कोणताही उपसर्ग देवू नये म्हणून महाराजांनी
बारीकसारीक सूचना दिलेल्या होत्या. हे पत्र १९ मे १६७१ चे असून राजवाडे खंड ८ मध्यें प्रसिध्द
झालेले आहे. या पत्रातून महाराजांची रयतेविषयीची तळमळ स्पष्ट होते. महाराज या पत्रात इशारा
देतात की, `कोणावरी जुलुम अगर ज्याजती अगर कोण्यासी कालगती करावयाची गरज नाही ....
लोक जातील.

**मराठ्यांची इज्जत :-**

मराठ्यांची इज्जत :- पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकास महाराज भरपूर
सैनिकांवर महाराजांचे जिवापाड प्रेम होते. पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकास महाराज भरपूर
इनाम देत असत. त्याचे कौतुक करीत. शौर्य गाजविणाऱ्या वीरांना हत्ती, घोडे, जडजवाहीर, सोन्याचे
कडे वगैरे बक्षीस देवून त्यांचा गौरव करीत असत. एखादा सेनानी धारातीर्थी पडला तर महाराज
स्वत: त्यांच्या कुटुंबीयांकडे जावून त्याचे सांत्वन करीत. सिंहगड किल्ला जिंकताना तानाजीला वीर
मरणे आले, तेव्हा शिवाजीमहाराजांना विलक्षण दु:ख झाले. त्यावेळी त्यांनी उद्‌गार काढले की, `एक
गड आला पण दुसरा गड गेला.` वीर आणि स्वामीनिष्ठ सहकाऱ्यांना महाराज गड समजत असत.
नेसरीच्या युध्दात सेनापती प्रतापराव गुजर रणांगणावर पडले तेव्हा महाराजांनी उद्‌गार काढले, `माझी
ी एक बाजू पडली.` युध्दात जखमी झालेलया सैनिकांची ते जातीने विचारपूस करीत. जे सैनिक
रणांगणावर पडत असत त्यांच्या बायका, मुलांना तैनात देण्यात येत असे. अशा तैनातीस `बालपरदेशी`
असे म्हणत. त्याच बरोबर ज्याच्याकडून गुन्हा घडेल त्याला कडक शिक्षा देण्यातही महाराज कुचराई
करीत नसत. नेताजी पालकरसारखा धुरंधर सेनापती एका प्रसंगी वेळेवर पोहोचला नाही, तर
महाराजांनी त्याला सेनापतिपदावरून दूर केले. बहलोल खानाला प्रतापराव गुजराने पराभूत केले.
परंतु उदार मनाने त्याने खानाला सोडून दिले.

शिवाजीमहारांच्या लष्करी तळाचे स्वरूप अतिशय साधे होते. डच पत्रव्यवहारामध्ये शिवाजीच्या
लष्करी तळाची माहिती मिळते. १६६४ मध्ये शिवाजी महाराजांनी सुरतेवर स्वारी केली. तेव्हा त्यांचा
लष्करी तळ कसा होता, याचा उल्लेख डच रेकॉर्डमध्ये आला आहे. `शिवाजी सुरतेबाहेर दोन
कोसावर उतरले होते. फक्त त्यांचाच एक शामियाना होता.

शिवाजीमहाराजांच्या युध्दनीतीचे आणखी एक खास वैशिष्टय म्हणजे सर्वच प्रकारच्या
अधिकाऱ्यांकडून युध्द कार्यास सहभागी होण्याची अपेक्षा असे. त्यांच्या अष्ट प्रधानांपैकी पंडितराव
आणि न्यायाधीश हे दोन प्रधान सोडल्यास इतर सहा प्रधानांनी युध्द कार्यात सहभागी झाले पाहिजे.

असा त्यांचा दंडक होता. महाराजांच्या लष्करी व्यवस्थेत 'हुजरात' हे खास सैन्यदल होते. महाराजांबरोबर हे लष्कर राहत असे. अत्यंत स्वामीनिष्ठ व साहसी अशा शूरवीरांचा हुजरातमध्ये भरणा असे. प्रारंभीच्या काळात जेधे, देशमुख आणि सिलिमकर देशमुख यांचे खास पथक महाराजांबरोबर असे. हुजरातचे महत्त्व अमात्यांनी आज्ञापत्रात स्पष्ट केले आहे. जलद आणि परिणामकारक हालचाली करता येण शक्य व्हावे म्हणून शिवाजीमहाराजांनी आटोपशीर असे सैन्यदल उभारले होते.

**महाराजांचे हेर :-**

शिवाजीमहाराजांचे हेर खातेही मोठे विलक्षण होते. बहिर्जी नाईक हा महाराजांच्या गुप्तहेर खात्याचा प्रमुख होता. वल्लभ गंगादास नावाचा गुजराथी व्यापारी महाराजांसाठी हेरगिरी करत होता. डीग्राफ नावाच्या लेखकाने १६६९ मध्ये असे लिहून ठेवले आहे की, पोर्तुगीज महाराजांसाठी हेरगिरी करत होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वेळप्रसंगी महाराज स्वतःच हेर बनत असत. उत्तम हेर खाते हे युध्द नीतीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. या बाबतही महाराजांनी आपल्या शत्रूवर मात केली होती. लष्करांमध्ये सैनिकांची निवड करताना अतिशय काटेकोरपणे निवड केली जात असे. लष्करात कोणत्या प्रकारचे लोक नसावेत याचे उत्तम मार्गदर्शन अमात्यांनी आज्ञापत्रात केले आहे. ते लिहितात, तन्हेवाईक, शेरखोर, अमर्याद, बालभाष्य, व्यसनी, कुचाळया करणारा व एका धन्यापासून हरामखोरी करून आला असेल, असे लोक हुजरातीत एकंदर ठेवू नयेत, शिवाजीमहाराजांच्या युध्दनीतीचे स्वरूप अशा प्रकारे सर्वस्पर्शी होते. म्हणूनच प्रचंड सामर्थ्य असलेल्या शत्रूविरूध्द महाराजांनी विजय संपादन केले.

## संदर्भ सूची :-


१) पगडी, सेतु माधव - मोगल आणि मराठे - ठोकळ प्रकाशन पूणे - इ.स. १९६३.
२) पगडी, सेतु माधव - मराठे व औरंगजेब - ज्ञानराज प्रकाशन पूणे.
३) राजवाडे, वि.का. मराठयांच्या इतिहासाची साधने खंड १०.
४) आठवले, सदाशिव - मराठी सत्तेचा विकास आणि र्‍हास - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर इ.स. १९८२.
५) देशपांडे, प्र.न. : नुतनसृष्टीचा जनक शिवछत्रपति स्नेहवर्धन पकाशन पूणे २००८.
६) राजवाडे, वि.का. मराठयांच्या इतिहासाची साधने खंड ८.
७) सरकार जदुनाथ, मोगल साम्राज्य का पतन खंड १.
८) सरकार जदुनाथ, मोगल साम्राज्य का पतन खंड २.
९) सरदेसाई, गो.स., मराठों का नवीन इतिहास खंड २.
१०) पवार, जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय.